महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
कुमठेकर मार्ग, ७०८ सदाशिव पेठ, पुणे- ४११०३०
संपर्क क्रमांक- ०२०-२४४७६९३८ ई-मेल- curriculumdept@maa.ac.in

**जा.क्र. E:१९३७८७३/अविवि/SE/२०२६/**
**दिनांक- १२/०६/२०२६**

**परिपत्रक**

**विषय- नवीन अभ्यासक्रमानुसार इयत्ता ३री ते ८वी साठी विषययोजना, शालेय कामाचे दिवस, विषय निहाय तासिका विभागणी व शालेय वेळापत्रक निश्चित करणेबाबत.**

**संदर्भ-** १.या कार्यालयाकडील परिपत्रक जाक्र. विप्रा /अविवि/तावि/३६०५अ, दिनांक ०५/१०/२०१७
२.राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) (NCF-SE) २०२३
३.राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) (SCF-SE) २०२४
४.या कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र. राशैसंप्रपम/अविवि/FS/१२९२६९९/२०२५ दिनांक- ०२/०७/२०२५
५.शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण- २०२५/प्र.क्र.९४/एस.डी.-४ दि.१४/०७/२०२५

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंमलबजावणी अंतर्गत राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) (NCF-SE) २०२३, राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) (SCF-SE) २०२४ व नवीन शालेय शिक्षण अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णय दि.१४/०७/२०२५ अन्वये सन २०२५-२६ पासून राज्यात नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे. नवीन अभ्यासक्रम लागू होणाऱ्या इयत्तांसाठी विषय निहाय शैक्षणिक तासिका विभागणी विहित करणे आवश्यक आहे. संदर्भ क्र.४ येथील परिपत्रकान्वये इ.१ली व २री साठी शालेय वेळेचे नियोजन विहित करुन देण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत लागू असलेले संदर्भ क्र.१ येथील परिपत्रक दि.०५/१०/२०१७ मध्ये सुधारणा करुन इ.३री ते ८वी साठी विषयवार तासिका विभागणी व वेळेचे नियोजन याद्वारे राज्यात लागू करण्यात येत आहे.

नवीन अभ्यासक्रम लागू होणार असल्याने इयत्ता ३री ते ८वी साठी विषययोजना, तासिका विभागणी व वेळापत्रकाबाबत पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**अ. शालेय वेळेचे नियोजन-**

शाळांसाठी वार्षिक दिवस व वेळेचे नियोजन पुढीलप्रमाणे असेल.

| ३६५ | वार्षिक दिवस | कामकाज |
|---|---|---|
| **शालेय कामकाज २३७ दिवस.** | **२१०** (२१०/६ दिवस =३५आठवडे) | शाळेतील अध्ययन-अध्यापन कृती (वर्गकार्य) |
| | **१४** | परीक्षा, मूल्यांकन व अनुषंगिक कृती |
| | **१३** | सहशालेय उपक्रम- (दप्तराविना शाळा, शैक्षणिक सहल, शिबीर, इ.) |
| **एकूण सुट्ट्या १२८ दिवस** | **५२** | रविवार सुट्ट्या |
| | **७६** | अन्य सुट्ट्या |

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंमलबजावणी अंतर्गत नवीन अभ्यासक्रम अंमलबजावणी करीता शाळांसाठी वरीलप्रमाणे वेळेचे नियोजन लागू करण्यात येत आहे. एकाच सत्रात भरणाऱ्या व दोन सत्रात भरणाऱ्या शाळांसाठी वेळेची विभागणी स्वतंत्रपणे देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
कुमठेकर मार्ग, ७०८ सदाशिव पेठ, पुणे- ४११०३०
संपर्क क्रमांक- ०२०-२४४७६९३८ ई-मेल- curriculumdept@maa.ac.in

**आ. विषययोजना-**

**शालेय शिक्षण अभ्यासक्रम २०२६ नुसार (इयत्ता- ३री ते ५वी साठी) विषययोजना**

| क्र | मराठी माध्यमाच्या शाळा | इंग्रजी माध्यमाच्या शाळा | अन्य माध्यमाच्या शाळा |
|---|---|---|---|
| १ | मराठी (R-१) | इंग्रजी (R-१) | माध्यम भाषा (R-१) (हिंदी/ उर्दू/ गुजराती/ कन्नड/ तमिळ/ तेलुगु/ सिंधी/ बांग्ला) |
| २ | इंग्रजी (R-२) | मराठी (R-२) | इंग्रजी (R-२) |
| ३ | प्रचलित पद्धतीनुसार (भाषा) | प्रचलित पद्धतीनुसार (भाषा) | मराठी (R-३) |
| ४ | गणित | गणित | गणित |
| ५ | आपल्या सभोवतालचे जग-१ | आपल्या सभोवतालचे जग-१ | आपल्या सभोवतालचे जग-१ |
| ६ | आपल्या सभोवतालचे जग-२ | आपल्या सभोवतालचे जग-२ | आपल्या सभोवतालचे जग-२ |
| ७ | कलाशिक्षण | कलाशिक्षण | कलाशिक्षण |
| ८ | शारीरिक शिक्षण व निरामयता | शारीरिक शिक्षण व निरामयता | शारीरिक शिक्षण व निरामयता |
| ९ | कार्यशिक्षण | कार्यशिक्षण | कार्यशिक्षण |
| * | स्काऊट / गाईड - एच्छिक | | |

**शालेय शिक्षण अभ्यासक्रम २०२६ नुसार (इयत्ता- ६वी ते ८वी साठी) विषययोजना**

| क्र | मराठी माध्यमाच्या शाळा | इंग्रजी माध्यमाच्या शाळा | अन्य माध्यमाच्या शाळा |
|---|---|---|---|
| १ | मराठी (R-१) | इंग्रजी (R-१) | माध्यम भाषा (R-१) (हिंदी/ उर्दू/ गुजराती/ कन्नड/ तमिळ/ तेलुगु/ सिंधी/ बांग्ला) |
| २ | इंग्रजी (R-२) | मराठी (R-२) | इंग्रजी (R-२) |
| ३ | प्रचलित पद्धतीनुसार भाषा | प्रचलित पद्धतीनुसार भाषा | प्रचलित पद्धतीनुसार भाषा |
| ४ | गणित | गणित | गणित |
| ५ | विज्ञान | विज्ञान | विज्ञान |
| ६ | सामाजिक शास्त्रे | सामाजिक शास्त्रे | सामाजिक शास्त्रे |
| ७ | कलाशिक्षण | कलाशिक्षण | कलाशिक्षण |
| ८ | शारीरिक शिक्षण व निरामयता | शारीरिक शिक्षण व निरामयता | शारीरिक शिक्षण व निरामयता |
| ९ | कार्यशिक्षण | कार्यशिक्षण | कार्यशिक्षण |
| * | स्काऊट / गाईड - एच्छिक | | |

- त्रिभाषा धोरण अंमलबजावणीबाबत समितीच्या शिफारशी व त्यावरील होणाऱ्या शासनाचे निर्णयास अनुसरुन तिसऱ्या भाषेबाबत निर्णय होईपर्यंत प्रचलित अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तकांचा उपयोग करण्यात यावा. असा निर्णय राज्यस्तरीय सुकाणू समिती बैठक दि.१०/०२/२०२६ मध्ये घेण्यात आलेला आहे. सबब, प्रचलित पद्धतीनुसार तिसरी भाषा (R-२ अथवा Composite) बाबत विद्यमान धोरण कायम असल्याने इ.५वी पासून पुढील वर्गांसाठी यापूर्वी लागू असलेली तिसरी भाषा पद्धती नवीन धोरण व नवीन अभ्यासक्रम लागू होईपर्यंत तशीच लागू राहील.
- पूर्वीचा कार्यानुभव हा विषय यापुढे कार्यशिक्षण या नावाने ओळखला जाईल.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
कुमठेकर मार्ग, ७०८ सदाशिव पेठ, पुणे- ४११०३०
संपर्क क्रमांक- ०२०-२४४७६९३८ ई-मेल- curriculumdept@maa.ac.in

**इ. विषयनिहाय तासिका विभागणी व शालेय वेळापत्रक- (सूचना)**

१. सदर निर्देश हे इ.३री, ४थी, ६वी साठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासूनच अंमलात येतील, इ.५वी, ७वी व ८वी साठी नवीन पाठ्यपुस्तके लागू झाल्यावर बंधनकारक राहतील.

२. इतर इयत्तांसाठी सुद्धा वेळापत्रक याप्रमाणे ठेवण्यास हरकत नाही जेणेकरुन शाळेतील घंटा/ Bell वाजविण्याचे नियोजन सुकर होईल. इतर वर्गांसाठी त्यांच्या विषयरचनेप्रमाणे विषयनिहाय तासिकांची संख्या प्रचलित सूचनांप्रमाणे ठेवावी.

३. यासोबत नमुन्यादाखल देण्यात आलेले साप्ताहिक शालेय वेळापत्रक हे एक उदाहरण असून त्यामध्ये विषय तासिकेच्या क्रमवारीमध्ये व शाळा सुरु करण्याच्या वेळेमध्ये शाळांना बदल करता येतील. परंतु विषयनिहाय अध्ययन-अध्यापनाचा साप्ताहिक व वार्षिक घड्याळी तासांचा कालावधी कोणत्याही विषयासाठी शाळा स्तरावर कमी करता येणार नाही.

४. वेळापत्रकामध्ये काही ठिकाणी २ तासिका जोडून घेतलेल्या आहेत. त्यामध्ये तोंडी-लेखी-प्रात्यक्षिक-सराव असे वैविध्यपूर्ण अध्यापन होणे अपेक्षित आहे.

५. पूर्णवेळ शाळांमधील अध्यापन कालावधी व दोन सत्रात भरणाऱ्या शाळांमधील अध्यापन कालावधी समान राहील याची दक्षता घेतलेली आहे. केवळ परिपाठ, मधली सुट्टी, अतिरिक्त समृद्धीकरण तासिका (AEP-Additional Enrichment Period) यांच्या कालावधीमध्ये वेळेच्या उपलब्धतेनुसार तफावत असू शकेल.

६. अतिरिक्त समृद्धीकरण तासिका (AEP) ह्या विद्यार्थ्यांना कोणत्याही अभ्यास विषयात सक्षम करण्यासाठी अतिरिक्त मार्गदर्शनासाठी आहेत. यामध्ये उपचारात्मक अध्यापन, स्पर्धा परीक्षा तयारी, सराव इत्यादी उपक्रम घेता येतील. अतिरिक्त समृद्धीकरण तासिका (AEP) कोणत्या विषयासाठी आवश्यक आहे हे शाळेतील गरजेनुसार ठरवावे.

७. दोन सत्राच्या वेळापत्रकामध्ये अतिरिक्त समृद्धीकरण (AEP) तासिकांसाठी वेळ देता आलेला नाही, अशा शाळांनी शालेय वेळेव्यतिरिक्त/ विद्यार्थी विभागणी करून, अतिरिक्त समृद्धीकरण तासिका (AEP) पूर्ततेसाठी प्रयत्न करावेत.

८. AEP ही पूरक मार्गदर्शनासाठी असल्याने त्याचा समावेश नियमित वार्षिक अध्यापन कालावधीमध्ये करण्यात आलेला नाही तथापि ह्या तासिका साप्ताहिक वेळापत्रकामध्ये दर्शविलेल्या आहेत.

९. स्काऊट गाईड, आनंददायी शनिवार असे पूरक उपक्रम शालेय वेळेव्यतिरिक्त घेता येतील.

१०. या कार्यालयाकडील पत्र जा.क्र./रा.शै.सं.प्र.प/स.वि./मूल्यवर्धन दिनदर्शिका/२०२५-२६ दिनांक: ०२/०९/२०२५ अन्वये इ.१ली ते ८वी च्या शाळांमध्ये मूल्यवर्धन उपक्रमासाठी तासिका नियोजन दिलेले आहे. मूल्यवर्धन उपक्रम लागू असलेल्या शाळांनी त्यानुसार कार्यवाही करावी.

**सोबत- परिशिष्ट-अ-१,२ विषयनिहाय तासिका,**
**परिशिष्ट-ब-१,२ नमुना वेळापत्रक.**

**(डॉ. हेमंत वसेकर** भा.प्र.से.**)**
**संचालक**
**राज्य शैक्षणिक संशोधन व**
**प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे**

**प्रत, माहितीस्तव,**

- शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
- शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

परिशिष्ट-अ-१

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

## शालेय शिक्षण (पूर्वतयारी स्तर) इयत्ता तिसरी ते पाचवी - विषय निहाय तासिका व भारांश

**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२३ नुसार, सुचविलेले विषय निहाय वेळेचे नियोजन**

| | | साप्ताहिक तासिका | एका तासिकेचा (सरासरी) कालावधी | अध्यापनाचा साप्ताहिक कालावधी (तास) | अध्यापनाचा वार्षिक कालावधी (तास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | Library | २ | ४० मि. | १.३३ | ४५.७१ |
| २ | R१ | ६ | ४० मि. | ४.०० | १३७.१४ |
| ३ | R२ | ८.५ | ४० मि. | ५.६७ | १९४.२९ |
| ४ | R३ | * | * | * | * |
| ५ | Mathematics | ८ | ४० मि. | ५.३३ | १८२.८६ |
| ६ | Science (TWAU) | ९ | ४० मि. | ६.०० | २०५.७१ |
| ७ | Social Science | * | * | * | * |
| ८ | Art Education | ४.५ | ४० मि. | ३.०० | १०२.८६ |
| ९ | Physical Education | ४.५ | ४० मि. | ३.०० | १०२.८६ |
| १० | Vocational Education | * | * | * | * |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण | ४२.५ | ० | २८.३३ | ९७१.४३ |

**(मराठी व इंग्रजी माध्यम वगळून अन्य माध्यमांसाठी)**
**राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ नुसार, नवीन अभ्यासक्रमासाठी राज्यात लागू करावयाचे वेळेचे नियोजन**

| विषय | साप्ताहिक तासिका | एका तासिकेचा कालावधी (मिनिटे) | अध्यापनाचे साप्ताहिक घड्याळी तास | अध्यापनाचे वार्षिक तास (०६ दिवसांचे ३५ आठवडे यानुसार) |
|---|---|---|---|---|
| ग्रंथालय | १ | ३५ | ०.५८ | २०.४२ |
| R१ | ६ | ३५ | ३.५० | १२२.५० |
| R२ | ६ | ३५ | ३.५० | १२२.५० |
| R३ | ६ | ३५ | ३.५० | १२२.५० |
| गणित | ९ | ३५ | ५.२५ | १८३.७५ |
| आपल्या सभोवतालचे जग-१ | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| आपल्या सभोवतालचे जग-२ | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| कलाशिक्षण | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| शारीरिक शिक्षण व निरामयता | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| कार्यशिक्षण | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| AEP, गृहकार्य व स्वयंअध्ययन कृती. | * | * | * | ६१.२५ |
| परीक्षा/ मूल्यमापन | * | * | * | ७३.५० |
| सहशालेय उपक्रम व परिपाठ | * | * | * | ६८.२५ |
| | ४८ | | २८.०० | ११८३.०० |

*अतिरिक्त समृद्धीकरण तासिका (AEP), गृहकार्य व स्वयंअध्ययन कृतीसाठी साप्ताहिक १०५ मिनिटे अपेक्षित.

**(मराठी व इंग्रजी माध्यमांसाठी)**
**राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ नुसार, नवीन अभ्यासक्रमासाठी राज्यात लागू करावयाचे वेळेचे नियोजन**

| विषय | साप्ताहिक तासिका | एका तासिकेचा कालावधी (मिनिटे) | अध्यापनाचे साप्ताहिक घड्याळी तास | अध्यापनाचे वार्षिक तास (०६ दिवसांचे ३५ आठवडे यानुसार) |
|---|---|---|---|---|
| ग्रंथालय | १ | ३५ | ०.५८ | २०.४२ |
| R१ | ८ | ३५ | ४.६७ | १६३.३३ |
| R२ | १० | ३५ | ५.८३ | २०४.१७ |
| *** | * | * | * | * |
| गणित | ९ | ३५ | ५.२५ | १८३.७५ |
| आपल्या सभोवतालचे जग-१ | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| आपल्या सभोवतालचे जग-२ | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| कलाशिक्षण | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| शारीरिक शिक्षण व निरामयता | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| कार्यशिक्षण | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| AEP, गृहकार्य व स्वयंअध्ययन कृती. | * | * | * | ६१.२५ |
| परीक्षा/ मूल्यमापन | * | * | * | ७३.५० |
| सहशालेय उपक्रम | * | * | * | ६८.२५ |
| | ४८ | | २८.०० | ११८३.०० |

*अतिरिक्त समृद्धीकरण तासिका (AEP), गृहकार्य व स्वयंअध्ययन कृतीसाठी साप्ताहिक १०५ मिनिटे अपेक्षित.

परिशिष्ट-अ-२

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

## शालेय शिक्षण (पूर्वमाध्यमिक स्तर) इयत्ता सहावी ते आठवी - विषय निहाय तासिका व भारांश

(सर्व माध्यमांसाठी)

| | राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२३ नुसार, सुचविलेले विषय निहाय वेळेचे नियोजन | | | | | राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ नुसार, नवीन अभ्यासक्रमासाठी राज्यात लागू करावयाचे वेळेचे नियोजन | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | साप्ताहिक तासिका | एका तासिकेचा (सरासरी) कालावधी | अध्यापनाचा साप्ताहिक कालावधी (तास) | अध्यापनाचा वार्षिक कालावधी (तास) | विषय | साप्ताहिक तासिका | एका तासिकेचा कालावधी (मिनिटे) | अध्यापनाचे साप्ताहिक घड्याळी तास | अध्यापनाचे वार्षिक तास (०६ दिवसांचे ३५ आठवडे यानुसार) |
| १ | Library | १ | ४० मि. | ०.६७ | २२.८६ | ग्रंथालय | १ | ३५ | ०.५८ | २०.४२ |
| २ | R१ | ३ | ४० मि. | २.०० | ६८.५७ | R१ | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| ३ | R२ | ३ | ४० मि. | २.०० | ६८.५७ | R२ | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| ४ | R३ | ३ | ४० मि. | २.०० | ६८.५७ | R३ | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| ५ | Mathematics | ५ | ४० मि. | ३.३३ | ११४.२९ | गणित | ६ | ३५ | ३.५० | १२२.५० |
| ६ | Science | ७ | ४० मि. | ४.६७ | १६०.०० | विज्ञान | ८ | ३५ | ४.६७ | १६३.३३ |
| ७ | Social Science | ७ | ४० मि. | ४.६७ | १६०.०० | सामाजिक शास्त्रे | ८ | ३५ | ४.६७ | १६३.३३ |
| ८ | Art Education | ४.५ | ४० मि. | ३.०० | १०२.८६ | कलाशिक्षण | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| ९ | Physical Education | ४.५ | ४० मि. | ३.०० | १०२.८६ | शारीरिक शिक्षण व निरामयता | ४ | ३५ | २.३३ | ८१.६७ |
| १० | Vocational Education | ४.५ | ४० मि. | ३.०० | १०२.८६ | व्यावसायिक शिक्षण | ५ | ३५ | २.९२ | १०२.०८ |
| | | | | | | AEP, गृहकार्य व स्वयंअध्ययन कृती. | * | * | * | १२२.५० |
| | | | | | | परीक्षा/ मूल्यमापन | * | * | * | ७३.५० |
| | | | | | | सहशालेय उपक्रम व परिपाठ | * | * | * | ६८.२५ |
| | एकूण | ४२.५ | ० | २८.३३ | ९७१.४३ | | ४८ | | २८.०० | १२४४.२५ |

R१-भाषा-१, R२-भाषा-२, R३-भाषा-३

*अतिरिक्त समृद्धीकरण तासिका (AEP), गृहकार्य व स्वयंअध्ययन कृतीसाठी दैनंदित ३५ मिनिटे अपेक्षित.

दोन भाषा संयुक्त स्वरुपात घेतल्यास त्यामधील दोन्ही भाषांना तिसऱ्या भाषेसाठीच्या देय तासिका विभागून देण्यात येतील.

(परिशिष्ट-ब-१)

## (नमुना वेळापत्रक) इयत्ता- तिसरी ते चौथी: मराठी व इंग्रजी माध्यमांसाठी

| तक्ता-१ | दोन भाषा | एकाच सत्रात/ पूर्णवेळ भरणाऱ्या शाळांसाठी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | | सोमवार ते शनिवार | | | | | | |
| तासिका | वेळ | कालावधी | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
| | **००:०० ते ००:२५** | **२५ मि.** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** |
| १ | ००:२५ ते ०१.०० | ३५ मि. | R१ | गणित | R१ | गणित | R१ | शा. शि. |
| २ | ०१:०० ते ०१:३५ | ३५ मि. | R१ | गणित | R१ | गणित | R१ | शा. शि. |
| ३ | ०१.३५ ते ०२.१० | ३५ मि. | गणित | R१ | गणित | R२ | आ.स.ज.२ | कार्यशिक्षण |
| ४ | ०२.१० ते ०२.४५ | ३५ मि. | गणित | R१ | गणित | R२ | आ.स.ज.२ | ग्रंथालय |
| | **०२.४५ ते ०३.२५** | **४० मि.** | **मोठी सुट्टी** | | | | | |
| ५ | ०३.२५ ते ०४.०० | ३५ मि. | R२ | आ.स.ज.१ | आ.स.ज.२ | आ.स.ज.१ | R२ | R२ |
| ६ | ०४.०० ते ०४.३५ | ३५ मि. | R२ | आ.स.ज.१ | आ.स.ज.२ | आ.स.ज.१ | R२ | AEP |
| ७ | ०४.३५ ते ०५.१० | ३५ मि. | कलाशिक्षण | कार्यशिक्षण | कलाशिक्षण | कार्यशिक्षण | कार्यशिक्षण | *** |
| | **०५.१० ते ०५.२०** | **१० मि.** | **छोटी सुट्टी** | | | | | |
| ८ | ०५.२० ते ०५.५५ | ३५ मि. | R२ | कलाशिक्षण | R२ | शा. शि. | गणित | *** |
| ९ | ०५.५५ ते ०६.३० | ३५ मि. | AEP | कलाशिक्षण | R२ | शा. शि. | AEP | *** |
| | **समारोप** | | | | | | | |

आ.स.ज.- आपल्या सभोवतालचे जग

| तक्ता-२ | दोन भाषा | दोन सत्रात भरणाऱ्या शाळांसाठी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४८ | | सोमवार ते शनिवार | | | | | | |
| तासिका | वेळ | कालावधी | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
| | **००:०० ते ००:१५** | **१५ मि.** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** |
| १ | ००:१५ ते ००:५० | ३५ मि. | R१ | गणित | R१ | गणित | R१ | शा. शि. |
| २ | ००:५० ते ०१:२५ | ३५ मि. | R१ | गणित | R१ | गणित | R१ | शा. शि. |
| ३ | ०१:२५ ते ०२:०० | ३५ मि. | गणित | R२ | गणित | R२ | आ.स.ज.२ | कार्यशिक्षण |
| ४ | ०२.०० ते ०२.३५ | ३५ मि. | गणित | R२ | गणित | R२ | आ.स.ज.२ | ग्रंथालय |
| | **०२:३५ ते ०३:००** | **२५ मि.** | **मोठी सुट्टी** | | | | | |
| ५ | ०३:०० ते ०३:३५ | ३५ मि. | R२ | आ.स.ज.१ | आ.स.ज.२ | आ.स.ज.१ | R२ | R२ |
| ६ | ०३:३५ ते ०४:१० | ३५ मि. | R२ | आ.स.ज.१ | आ.स.ज.२ | आ.स.ज.१ | R२ | R२ |
| ७ | ०४.१० ते ०४.४५ | ३५ मि. | कलाशिक्षण | कार्यशिक्षण | कलाशिक्षण | कार्यशिक्षण | कार्यशिक्षण | कलाशिक्षण |
| ८ | ०४:४५ ते ०५:२० | ३५ मि. | शा. शि. | कलाशिक्षण | शा. शि. | R१ | गणित | R१ |
| | **समारोप** | | | | | | | |
| | | | AEP | | | | AEP | AEP |

## (नमुना वेळापत्रक) (इ.तिसरी ते चौथी: मराठी व इंग्रजी वगळून अन्य माध्यमांसाठी) आणि (इ.पाचवी: सर्व माध्यमांसाठी)

| तक्ता-३ | तीन भाषा | एकाच सत्रात/ पूर्णवेळ भरणाऱ्या शाळांसाठी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | | सोमवार ते शनिवार | | | | | | |
| तासिका | वेळ | कालावधी | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
| | **००:०० ते ००:२५** | **२५ मि.** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** |
| १ | ००:२५ ते ०१.०० | ३५ मि. | R१ | गणित | R१ | गणित | R१ | शा. शि. |
| २ | ०१:०० ते ०१:३५ | ३५ मि. | R१ | गणित | R१ | गणित | R१ | शा. शि. |
| ३ | ०१.३५ ते ०२.१० | ३५ मि. | गणित | R२ | गणित | R२ | आ.स.ज.२ | कार्यशिक्षण |
| ४ | ०२.१० ते ०२.४५ | ३५ मि. | गणित | R२ | गणित | R२ | आ.स.ज.२ | ग्रंथालय |
| | **०२.४५ ते ०३.२५** | **४० मि.** | **मोठी सुट्टी** | | | | | |
| ५ | ०३.२५ ते ०४.०० | ३५ मि. | R३ | आ.स.ज.१ | आ.स.ज.२ | आ.स.ज.१ | R३ | R२ |
| ६ | ०४.०० ते ०४.३५ | ३५ मि. | R३ | आ.स.ज.१ | आ.स.ज.२ | आ.स.ज.१ | R३ | AEP |
| ७ | ०४.३५ ते ०५.१० | ३५ मि. | कलाशिक्षण | कार्यशिक्षण | कलाशिक्षण | कार्यशिक्षण | कार्यशिक्षण | *** |
| | **०५.१० ते ०५.२०** | **१० मि.** | **छोटी सुट्टी** | | | | | |
| ८ | ०५.२० ते ०५.५५ | ३५ मि. | R२ | कलाशिक्षण | R३ | शा. शि. | गणित | *** |
| ९ | ०५.५५ ते ०६.३० | ३५ मि. | AEP | कलाशिक्षण | R३ | शा. शि. | AEP | *** |
| | **समारोप** | | | | | | | |

आ.स.ज.- आपल्या सभोवतालचे जग

| तक्ता-४ | तीन भाषा | दोन सत्रात भरणाऱ्या शाळांसाठी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४८ | | सोमवार ते शनिवार | | | | | | |
| तासिका | वेळ | कालावधी | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
| ० | **००:०० ते ००:१५** | **१५ मि.** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** |
| १ | ००:१५ ते ००:५० | ३५ मि. | R१ | गणित | R१ | गणित | R१ | शा. शि. |
| २ | ००:५० ते ०१:२५ | ३५ मि. | R१ | गणित | R१ | गणित | R१ | शा. शि. |
| ३ | ०१:२५ ते ०२:०० | ३५ मि. | गणित | R२ | गणित | R२ | आ.स.ज.२ | कार्यशिक्षण |
| ४ | ०२.०० ते ०२.३५ | ३५ मि. | गणित | R२ | गणित | R२ | आ.स.ज.२ | ग्रंथालय |
| | **०२:३५ ते ०३:००** | **२५ मि.** | **मोठी सुट्टी** | | | | | |
| ५ | ०३:०० ते ०३:३५ | ३५ मि. | R३ | आ.स.ज.१ | R३ | आ.स.ज.१ | R३ | R२ |
| ६ | ०३:३५ ते ०४:१० | ३५ मि. | R३ | आ.स.ज.१ | R३ | आ.स.ज.१ | R३ | R२ |
| ७ | ०४.१० ते ०४.४५ | ३५ मि. | कलाशिक्षण | कार्यशिक्षण | कलाशिक्षण | कार्यशिक्षण | कार्यशिक्षण | कलाशिक्षण |
| ८ | ०४:४५ ते ०५:२० | ३५ मि. | शा. शि. | कलाशिक्षण | आ.स.ज.२ | शा. शि. | गणित | आ.स.ज.२ |
| | **समारोप** | | | | | | | |
| | | | AEP | | | | AEP | AEP |

(परिशिष्ट-ब-२)

(नमुना वेळापत्रक) इयत्ता- सहावी ते आठवी: सर्व माध्यमांसाठी

| तक्ता-५ | दोन भाषा | एकाच सत्रात/ पूर्णवेळ भरणाऱ्या शाळांसाठी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | | सोमवार ते शनिवार | | | | | | |
| तासिका | वेळ | कालावधी | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
| | **००:०० ते ००:२५** | **२५ मि.** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** |
| १ | ००:२५ ते ०१.०० | ३५ मि. | R१ | गणित | R३ | गणित | R१ | शा. शि. |
| २ | ०१:०० ते ०१:३५ | ३५ मि. | R१ | गणित | R३ | गणित | R१ | शा. शि. |
| ३ | ०१.३५ ते ०२.१० | ३५ मि. | कलाशिक्षण | R२ | विज्ञान | R२ | विज्ञान | सामा.शास्त्रे. |
| ४ | ०२.१० ते ०२.४५ | ३५ मि. | ग्रंथालय | R२ | विज्ञान | R२ | विज्ञान | विज्ञान |
| | **०२.४५ ते ०३.२५** | **४० मि.** | **मोठी सुट्टी** | | | | | |
| ५ | ०३.२५ ते ०४.०० | ३५ मि. | गणित | विज्ञान | व्याव.शिक्षण | व्याव.शिक्षण | R३ | व्याव.शिक्षण |
| ६ | ०४.०० ते ०४.३५ | ३५ मि. | गणित | विज्ञान | व्याव.शिक्षण | व्याव.शिक्षण | R३ | AEP |
| ७ | ०४.३५ ते ०५.१० | ३५ मि. | शा. शि. | सामा.शास्त्रे. | सामा.शास्त्रे. | सामा.शास्त्रे. | सामा.शास्त्रे. | *** |
| | **०५.१० ते ०५.२०** | **१० मि.** | **छोटी सुट्टी** | | | | | |
| ८ | ०५.२० ते ०५.५५ | ३५ मि. | शा. शि. | सामा.शास्त्रे. | सामा.शास्त्रे. | विज्ञान | सामा.शास्त्रे. | *** |
| ९ | ०५.५५ ते ०६.३० | ३५ मि. | AEP | कलाशिक्षण | कलाशिक्षण | कलाशिक्षण | AEP | *** |
| | **समारोप** | | | | | | | |

| तक्ता-६ | दोन भाषा | दोन सत्रात भरणाऱ्या शाळांसाठी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४८ | | सोमवार ते शनिवार | | | | | | |
| तासिका | वेळ | कालावधी | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
| | **००:०० ते ००:१५** | **१५ मि.** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** | **परिपाठ** |
| १ | ००:१५ ते ००:५० | ३५ मि. | R१ | गणित | R३ | गणित | R१ | शा. शि. |
| २ | ००:५० ते ०१:२५ | ३५ मि. | R१ | गणित | R३ | गणित | R१ | शा. शि. |
| ३ | ०१:२५ ते ०२:०० | ३५ मि. | कलाशिक्षण | R२ | विज्ञान | R२ | विज्ञान | सामा.शास्त्रे. |
| ४ | ०२.०० ते ०२.३५ | ३५ मि. | ग्रंथालय | R२ | विज्ञान | R२ | विज्ञान | विज्ञान |
| | **०२:३५ ते ०३:००** | **२५ मि.** | **मोठी सुट्टी** | | | | | |
| ५ | ०३:०० ते ०३:३५ | ३५ मि. | गणित | विज्ञान | कलाशिक्षण | व्याव.शिक्षण | R३ | व्याव.शिक्षण |
| ६ | ०३:३५ ते ०४:१० | ३५ मि. | गणित | विज्ञान | व्याव.शिक्षण | व्याव.शिक्षण | R३ | व्याव.शिक्षण |
| ७ | ०४.१० ते ०४.४५ | ३५ मि. | शा. शि. | सामा.शास्त्रे. | सामा.शास्त्रे. | सामा.शास्त्रे. | सामा.शास्त्रे. | कलाशिक्षण |
| ८ | ०४:४५ ते ०५:२० | ३५ मि. | शा. शि. | सामा.शास्त्रे. | सामा.शास्त्रे. | विज्ञान | सामा.शास्त्रे. | कलाशिक्षण |
| | **समारोप** | | | | | | | |
| | | | AEP | | | | AEP | AEP |